| Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education<br>S.R.No.832-A, Final Plot No. 178,179,<br>Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda,<br>Shivajinagar, Pune-411004. | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ<br>स.न.८३२—ए, फा.प्लॉ.नं. १७८,१७९,<br>बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा,<br>शिवाजीनगर, पुणे ४११ ००४. |
|---|---|

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 & EPABX -25705000 &
Email : secretary.stateboard@gmail.com


<u>महत्वाचे</u>

क्रमांक रा.मं./परीक्षा—८/४२४८
पुणे—४११००४.
दिनांक—२५/१०/२०२४

प्रति,
विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे.

**विषय:— उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेसाठी श्रेणी सुधार (Class Improvement) योजनेच्या अटी व शर्ती संदर्भात...**

**संदर्भ:— १) दिनांक ०४/१०/२०२४ रोजी संपन्न झालेल्या कार्यकारी परिषद समितीतील ठराव.**
**२) या कार्यालयाचे क्रमांक रा.मं./परीक्षा—८/४२१८, दि. ०५/०६/२००८ रोजीचे पत्र.**
**३) या कार्यालयाचे क्रमांक रा.मं./परीक्षा—८/६१६१, दि. ०७/०६/२०१३ रोजीचे पत्र.**

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस सूचित करण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ १२ वी) परीक्षांसाठी श्रेणी सुधार योजने अंतर्गत संदर्भीय पत्रान्वये अटी व शर्ती निश्चित करण्यात आलेल्या आहेत. सदर अटी व शर्तींची अंमलबजावणी करीत असतांना विदयार्थ्यांना व मंडळांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. त्यामुळे सद्यस्थितीमध्ये असलेल्या अटी व शर्ती मध्ये काही सुधारणा करणे तसेच काही नविन मुदयांचा समावेश करण्यासाठी त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आलेली होती.

सदर त्रिसदस्यीय समितीने केलेल्या शिफारशी दि. ०४/१०/२०२४ च्या **कार्यकारी परिषदे** समोर सादर करण्यात आल्या असता परीक्षा समिती मध्ये मान्य झालेल्या ठरावानुसार सद्यस्थितीत असलेल्या काही सुधारित अटी व शर्ती मध्ये अंशत: बदल करण्यात आला असून सदर अंशत: बदलाची सुधारित माहिती खालील प्रमाणे आहे.

श्रेणी सुधार/गुणसुधार योजना (Class Improvement Scheme) ज्या अटी व शर्ती मध्ये सुधारणा करण्यात आलेल्या आहेत त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र. | सद्यस्थितीत असलेल्या अटी व शर्ती/तरतूद | सुधारित अटी व शर्ती/तरतूद |
|---|---|---|
| ०१ | १.श्रेणी सुधार योजना ही केवळ नियमित विद्यार्थ्यांसाठी नसून यामध्ये खाजगी विद्यार्थी, पुनर्परिक्षार्थी या सर्वच विदयार्थ्यांचा समावेश होतो. एकाच वेळी सर्व विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यास पुढील लगतच्या दोन परीक्षेसाठी नियमित विद्यार्थी, खाजगी विदयार्थी व पुनर्परिक्षार्थी विद्यार्थी यांना ही योजना लागू होते.<br>२.एकाच वेळी सर्व विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या उमेदवारास श्रेणी सुधार योजने अंतर्गत परीक्षेस प्रविष्ट होण्यासाठी लगेच येणा—या लगतच्या परीक्षेसाठी पहिली संधी आणि त्यानंतर लगतच्या परीक्षेसाठी दुसरी संधी आहे. पहिली संधी घेतलेला विद्यार्थी श्रेणी सुधार करण्यासाठी दुसरी संधीही घेऊ शकतो. | १.श्रेणी सुधार योजनेमध्ये नियमित विद्यार्थी, खाजगी विद्यार्थी, पुनर्परिक्षार्थी या सर्वच विदयार्थ्यांचा समावेश होतो. तेव्हा **एकाच वेळी सर्व विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या नियमित विद्यार्थी, खाजगी विदयार्थी व पुनर्परिक्षार्थी विद्यार्थ्यांना पुढील लगतच्या तीन परीक्षेसाठी ही योजना लागू करण्यात येत आहे.**<br>२.श्रेणी सुधार योजने अंतर्गत परीक्षेस प्रविष्ट होण्यासाठी लगेच येणाऱ्या लगतच्या परीक्षेसाठी पहिली संधी, त्यानंतर लगतच्या परीक्षेसाठी दुसरी संधी अणि त्यानंतर लगतच्या परीक्षेसाठी तिसरी संधी देण्यात येत आहे. **एकाच वेळी सर्व विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या नियमित विद्यार्थी, खाजगी विदयार्थी व पुनर्परिक्षार्थी विद्यार्थ्यांना पहिली, दुसरी किंवा तिसरी संधी, अशा तिन्ही संधी किंवा कोणतीही एक किंवा दोन संधी घेऊ शकतो.** |

| अ.क्र. | सद्यस्थितीत असलेल्या अटी व शर्ती/तरतूद | सुधारित अटी व शर्ती/तरतूद |
|---|---|---|
| ०२ | एकाच वेळी सर्व विषय घेवून उत्तीर्ण झालेला विद्यार्थीच या योजनेखाली अर्ज करू शकेल. श्रेणी सुधार अंतर्गत प्रविष्ट होणा—या विदयार्थ्याने स्वतंत्र आवेदनपत्र भरणे आवश्यक राहिल. | सदर तरतूद कायम ठेवण्यात येत आहे. |
| ०३ | एकाच वेळेस श्रेणी सुधार आणि तुरळक विषय घेवून (Isolated म्हणून) प्रविष्ट होता येणार नाही. | सदर तरतूद कायम ठेवण्यात येत आहे. |
| ०४ | विद्यार्थ्याला त्याने उत्तीर्ण केलेले सर्व विषय घेणे बंधनकारक राहील. नव्याने कोणताही/कोणतेही विषय घेता येणार नाहीत अथवा वगळता येणार नाहीत. | सदर तरतूद कायम ठेवण्यात येत आहे. |
| ०५ | विद्यार्थ्याने उत्तीर्ण केलेल्या परीक्षेनंतरच्या लगेच लगतच्या परीक्षासाठीच ही संधी फक्त दोनदा उपलब्ध राहील उदा. मार्चमध्ये उत्तीर्ण झालेला विद्यार्थी लगतच्या जुलै व मार्च परीक्षेस या योजनेखाली प्रविष्ट होवू शकेल लगतच्या परीक्षेसाठी पहिली संधी आणि त्यानंतर लगतच्या परीक्षेतील दुसरी संधी उपलब्ध असेल पहिल्या संधीचा लाभ उमेदवाराने न घेतल्यास त्यास दुसरी संधी उपलब्ध असेल. मात्र ही संधी अंतिम असेल. या संधीनंतर त्यास या योजनेनुसार पुन्हा परीक्षेस प्रविष्ट होता येणार नाही व तशी मागणी करता येणार नाही. | १.विद्यार्थ्याने उत्तीर्ण केलेल्या परीक्षेनंतरच्या लगेच लगतच्या परीक्षेसाठीच ही संधी फक्त तीनदा उपलब्ध राहील. उदा. मार्च मध्ये उत्तीर्ण झालेला विद्यार्थी लगतच्या जुलै, मार्च व जुलै परीक्षेस या योजनेखाली प्रविष्ट होवू शकेल. **लगतच्या परीक्षेसाठी पहिली संधी आणि त्यानंतर लगतच्या परीक्षेसाठी दुसरी संधी उपलब्ध असेल व त्यानंतर तिसरी संधीही उपलब्ध असेल.**<br>२.पहिल्या संधीचा लाभ उमेदवाराने न घेतल्यास त्यास दुसरी संधी उपलब्ध असेल, **त्यानंतर पहिल्या किंवा दुसऱ्या संधीचा लाभ उमेदवाराने न घेतल्यास त्यास तिसरी संधी उपलब्ध असेल, मात्र ही संधी अंतिम असेल या संधीनंतर त्यास या योजनेनुसार पुन्हा परीक्षेस प्रविष्ट होता येणार नाही व तशी मागणी करता येणार नाही.** |
| ०६ | विद्यार्थ्याला आधीच्या परीक्षेतील अंतर्गत मूल्यमापन, प्रकल्प व शालेय श्रेणीच्या विषयांमध्ये पूर्वी मिळालेले श्रेणी/गुण सुधार या योजनेखाली होणाऱ्या परीक्षेसाठी ग्राहय (Carry Forward) धरल्या जातील. मात्र लेखी परीक्षा, तोंडी परीक्षा व प्रात्यक्षिक परीक्षांचे पूर्वीचे कोणतेही गुण या योजनेमध्ये ग्राहय धरले जाणार नाहीत. या परीक्षांकरीता नव्याने प्रविष्ट व्हावे लागेल. | सदर तरतूद कायम ठेवण्यात येत आहे. |
| ०७ | या योजनेखाली प्रविष्ट होताना विद्यार्थ्याला विषय/शाखा, माध्यम, केंद्र, विभाग बदल अनुज्ञेय असणार नाही. | सदर तरतूद कायम ठेवण्यात येत आहे. |
| ०८ | विद्यार्थी ज्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातून आधीच्या परीक्षेला प्रविष्ट झाला असेल त्याच शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातून श्रेणी सुधार योजनेअंतर्गत प्रविष्ट होता येईल तसेच त्याच शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातून त्याचे आवेदनपत्र सादर करणे आवश्यक राहील व सदर शाळा/कनिष्ठ महाविद्यालय ज्या परीक्षा केंद्राच्या कार्यकक्षेत आहे तेच परीक्षा केंद्र त्याला मिळेल. | सदर तरतूद कायम ठेवण्यात येत आहे. |
| ०९ | या विद्यार्थ्यांचा निकाल सदर परीक्षेच्या इतर विद्यार्थ्यांच्या निकालाबरोबर जाहीर केला जाईल. मात्र या विद्यार्थ्यांना मूळ गुणपत्रिका मिळणार नाही. | सदर तरतूद कायम ठेवण्यात येत आहे. |

| अ.क्र. | सद्यस्थितीत असलेल्या अटी व शर्ती/तरतूद | सुधारित अटी व शर्ती/तरतूद |
|---|---|---|
| १० | निकाल जाहीर झाल्यानंतर या विद्यार्थ्यांना या योजनेखाली प्रविष्ट झालेल्या परीक्षेची गुणपत्रिका घेताना पूर्वी प्रविष्ट झालेल्या परीक्षेची गुणपत्रिका स्विकारावयाची आहे की नवीन परीक्षेची गुणपत्रिका स्विकारावयाची आहे हा विकल्प (विकल्प फॉर्मच्या नमुन्यात) देण्याचा अधिकार असेल.<br>विदयार्थ्याला संपूर्ण नवीन किंवा संपूर्ण पूर्वीच्या परीक्षेची गुणपत्रिका स्विकारणे बंधनकारक राहील काही विषयांचे गुण जुन्या परीक्षेचे व काही विषयांचे गुण नवीन परीक्षेचे अशी मागणी करता येणार नाही.<br>निकाल प्रसिध्द झाल्यानंतर संबंधित शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत एक महिन्याच्या आत त्यांनी श्रेणी सुधार योजनेअंतर्गत उत्तीर्णतेची गुणपत्रिका स्विकारण्याबाबत विकल्प अर्ज विभागीय मंडळाकडे सादर करणे अनिवार्य राहील.<br>१. एक महिन्यापर्यंत मागणी केल्यास सुधारित गुणपत्रिका विनाशुल्क देण्यात येईल.<br>२. एक महिन्यानंतर विकल्प देण्यास विलंब झाल्यास पुढील एक महिन्याकरिता रू. १००/— शुल्क आकारण्यात येईल.<br>३. नंतरच्या दोन महिन्यापासून ते सहा महिने कालावधी पर्यंत रू. २००/— प्रतिमाह शुल्क आकारून सुधारित गुणपत्रिका घेता येईल. | ०१. निकाल जाहीर झाल्यानंतर या विद्यार्थ्यांना या योजनेखाली प्रविष्ट झालेल्या परीक्षेची गुणपत्रिका घेताना पूर्वी प्रविष्ट झालेल्या परीक्षेची गुणपत्रिका स्विकारावयाची आहे की नवीन परीक्षेची गुणपत्रिका स्विकारावयाची आहे हा विकल्प (विकल्प फॉर्मच्या नमुन्यात) देण्याचा अधिकार असेल. विदयार्थ्याला संपूर्ण नवीन किंवा संपूर्ण पूर्वीच्या परीक्षेची गुणपत्रिका स्विकारणे बंधनकारक राहील.<br>०२. काही विषयांचे गुण जुन्या परीक्षेचे व काही विषयांचे गुण नवीन परीक्षेचे अशी मागणी करता येणार नाही. निकाल प्रसिध्द झाल्यानंतर संबंधित शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत एक महिन्याच्या आत त्यांनी श्रेणी सुधार योजने अंतर्गत उत्तीर्णतेची गुणपत्रिका स्विकारण्याबाबत विकल्प अर्ज विभागीय मंडळाकडे सादर करणे अनिवार्य राहील.<br>०३. श्रेणी सुधार योजनेअंतर्गत जे विद्यार्थी प्रविष्ट होतील त्या विद्यार्थ्यांना व पालकांना तसेच **संबधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांना विकल्प अर्ज सादर करणेबाबत विभागीय मंडळाने रजिस्टर ए. डी. ने पत्र पाठवावे, तसेच विद्यार्थ्यांना मोबाईलवर SMS करावेत. प्राचार्य/ मुख्याध्यापक सभेत श्रेणीसुधार योजनेच्या विदयार्थ्यांना विकल्प देण्याबाबतच्या सूचना द्याव्यात.**<br>०४. एका महिन्यापर्यंत मागणी केल्यास गुणपत्रिका विनाशुल्क देण्यात येईल व तद्नंतर पाच महिने कालावधीपर्यंत प्रतिमाह रू. ५००/— याप्रमाणे शुल्क आकारून गुणपत्रिका विद्यार्थ्यांना घेता येईल.<br>०५ **ज्या विद्यार्थ्यांनी निकालानंतर सहा महिन्यापर्यंत विकल्प दिला नाही, त्या विद्यार्थ्यांना त्यानंतर पुढील सहा महिन्यांपर्यंत राज्य मंडळाच्या मान्यतेने प्रतिमाह रू. ५००/— याप्रमाणे शुल्क आकारून निकाल देता येईल.** |
| ११ | विद्यार्थ्याने या योजनेखाली प्रविष्ट झालेल्या परीक्षेची गुणपत्रिका स्वीकारण्याचा निर्णय घेतल्यास त्याला यापूर्वी उत्तीर्ण झालेल्या परीक्षेची मूळ गुणपत्रिका मंडळाकडे विकल्पासोबत जमा करणे आवश्यक राहील. त्यानंतरच त्याला सदर योजनेखाली प्रविष्ट परीक्षेची गुणपत्रिका देण्यात येईल. जुन्या परीक्षेची संपादणूक स्विकारण्याचा विकल्प दिल्यास नवीन परीक्षेची संपादणूक रद्दबादल ठरविण्यात येईल. | सदर तरतूद कायम ठेवण्यात येत आहे. |
| १२ | सदरहू योजनेखाली प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्याने नवीन गुणपत्रिका स्वीकारण्याचे ठरविल्यास त्या गुणपत्रिकेवर श्रेणी सुधार योजनेअंतर्गत (Under Class Improvement) असा उल्लेख असेल. | सदर तरतूद कायम ठेवण्यात येत आहे. |
| १३ | या योजनेअंतर्गत परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी परीक्षा शुल्क नियमित/पुनर्परिक्षार्थी विद्यार्थ्यांच्या निर्धारित शुल्काच्या दुप्पट शुल्क आकारले जाईल. एकदा भरलेले शुल्क परत दिले जाणार नाही व पुढील परीक्षेसाठी राखून ठेवता येणार नाही. | सदर तरतूद कायम ठेवण्यात येत आहे. |

| अ.क्र. | सद्यस्थितीत असलेल्या अटी व शर्ती/तरतूद | सुधारित अटी व शर्ती/तरतूद |
|---|---|---|
| १४ | नियमित उत्तीर्ण विद्यार्थी या योजनेनुसार जुलै–ऑगस्ट मध्ये होणाऱ्या परीक्षेस पुन्हा प्रविष्ट होवू इच्छितात त्यांनी संबंधित शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाशी संपर्क साधावा व मंडळाच्या सूचनेनुसार आवश्यक ती कार्यवाही करावी. | सदर तरतूद कायम ठेवण्यात येत आहे. |
| १५ | विद्यार्थ्याने गुणपडताळणीसाठी अर्ज केला असेल व गुणपडताळणीच्या निकालामुळे विद्यार्थ्याचे समाधान झाले असल्यास श्रेणीसुधार योजनेअंतर्गत परीक्षेस प्रविष्ट व्हायचे किंवा नाही हा निर्णय पूर्णत: त्या विद्यार्थ्यांचा असेल. | सदर तरतूद कायम ठेवण्यात येत आहे. |
| १६ | या योजनेअंतर्गत परीक्षेस प्रविष्ट होणारे विद्यार्थी मंडळाच्या पारितोषिकासाठी तसेच क्रीडा गुण सवलतीसाठी पात्र असणार नाहीत. | सदर तरतूद कायम ठेवण्यात येत आहे. |
| १७ | दिव्यांग विद्यार्थ्यांना देय असलेल्या सवलती अनुज्ञेय राहतील | सदर तरतूद कायम ठेवण्यात येत आहे. |
| १८ | नवीन तरतूद | श्रेणीसुधार योजनेअंतर्गत प्रविष्ट होऊन उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गुणात वाढ अथवा घट झाली तरी सदर विद्यार्थी शाळा/कनिष्ठ महाविद्यालय/विभागीय मंडळ यांच्याशी मुदतीत विकल्प सादर करण्याकरिता संपर्क साधत नसल्यामुळे श्रेणीसुधार योजनेअंतर्गत प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या ऑनलाईन गुणपत्रिकेत (Online Marksheet) निकाल (Result), एकूण गुण (Total Marks) व टक्केवारीची (Percentage %) नोंद असणार नाही, त्याऐवजी गुणपत्रिकेवर Option Pending, Contact to Divisional Board अशी नोंद असेल. त्यामुळे विद्यार्थ्यांनी संबंधित विभागीय मंडळाशी संपर्क साधणे अनिवार्य राहिल. |
| १९ | **नवीन तरतूद** | श्रेणीसुधार मधील अंतिम संधीमध्ये जर विद्यार्थी अनुत्तीर्ण झाला,तर त्यास मूळ संधी अथवा श्रेणीसुधार मधील संधी यापैकी एक निकाल स्वीकारणे बंधनकारक राहील. श्रेणीसुधार मधील अंतिम संधीतील अनुत्तीर्ण निकाल स्वीकारून पुन:श्च पुनर्परिक्षार्थी म्हणून परीक्षेची संधी घेता येणार नाही. |

सदरच्या सुधारित अटी व शर्ती ची अंमलबजावणी फेब्रुवारी –मार्च २०२४ च्या परीक्षेपासून करण्यात येत आहे. उर्वरित सदयस्थितीत असलेल्या अटी व शर्ती कायम ठेवण्यात येत आहेत. याची नोंद घ्यावी.

(देविदास कुलाळ)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे–०४

प्रत माहितीस्तव–

१) शाखाप्रमुख/शाखाधिकारी लेखा शाखा, राज्यमंडळ, पुणे.
२) गणकयंत्र व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्यमंडळ, पुणे.